# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 11 October 2025

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ११ ऑक्टोबर २०२५ दुपारी १.०० वा.

****

शेतकरी हा विकसित भारताचा महत्वपुर्ण स्तंभ असून शेती हा विकास यात्रेचा अविभाज्य घटक असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे.

प्रधानमंत्री धन –धान्य कृषी योजनेचा शुभारंभ आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नवी दिल्ली इथं करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. कृषी क्षेत्राशी निगडीत क्षेत्रांमध्ये जवळापास ४२ हजार कोटी रुपयांहून अधिक रकेमेच्या योजनांचं याद्वारे लोकार्पण या कार्यक्रमात करण्यात आलं. शेतकरी कल्याण, कृषि आत्मनिर्भरता और ग्रामीण पायाभूत सुविधा सक्षम करणं हा या योजनेचा उद्देश आहे.

देशाला गहू आणि तांदुळाच्या पलिकडं विचार करावा लागणार असून आयात कमी करुन निर्यातीला चालना देत, जगाचे द्वार खुलं करावं लागणार असल्याचं ते यावेळी म्हणाले. भारताला दरवर्षी डाळींची मोठ्या प्रमाणात आयात करावी लागत आहे, त्यामुळे दलहन मिशन अत्यंत गरजेचं असल्याचं पंतप्रधान मोदी म्हणाले. या योजनेसाठी देशभरातून निवडलेल्या शंभर जिल्ह्यांत राज्यातल्या छत्रपती संभाजीनगर, बीड आणि नांदेडसह नऊ जिल्ह्यांचा समावेश आहे. या कार्यक्रमात पंतप्रधान मोदी यांनी नांदेड जिल्ह्यातल्या शेतकऱ्यांशीही संवाद साधाला.

****

ज्येष्ठ समाज सेवक तथा भारतरत्न दिवंगत नानाजी देशमुख उर्फ चंडीकादास देशमुख आणि लोकनायक जयप्रकाश नारायण यांची आज जयंती. यानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांना अभिवादन केलं आहे. नानाजी देशमुख एक दूरदर्शी समाज सुधारक, राष्ट्र निर्माता आणि आत्मनिर्भरता तसंच ग्रामीण सशक्तिकरणाचे खंदे समर्थक होते. तसंच त्यांचं जीवन समर्पण, शिस्त आणि समाजसेवेचं प्रतिक आहे, या शब्दात त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. नानाजी देशमुख यांचा जन्म ११

ऑक्टोबर १९१६ रोजी परभणी जिल्ह्यात झाला होता. जयप्रकाश नारायण यांनी सामान्य नागरिकांचं सशक्तीकरण-सामाजिक न्याय, भारतीय संविधानाचं रक्षण तसंच लोकशाहीसाठी अथकपणे कार्य केलं, असं पंतप्रधान मोदी यांनी सामाजिक माध्यमावरील आपल्या संदेशात नमूद केलं.

****

आगामी सणा-सुदीच्या अनुषंगानं सर्व विमान प्रवासी वाहतूक कंपन्यांनी भाडेदर परवडणाऱ्या स्वरुपात नियंत्रीत ठेवावेत, असं आवाहन नागरी विमान वाहतूक मंत्री राममोहन नायडू यांनी केलं आहे. काल नवी दिल्ली इथं यासंदर्भात आयोजित मासिक आढावा बैठकीत ते बोलत होते. तसंच, नागरी विमान महासंचनालयानंही भाडे दरावर कटाक्षानं लक्ष देण्याची सुचना त्यांनी यावेळी दिली.

या पार्श्वभूमीवर विमान कंपन्यांनी प्रवाशांच्या सुरक्षेला प्राधान्य द्यावं, गरज पडल्यास अतिरिक्त उड्डाणंही वाढवावी असंही त्यांनी म्हटलं आहे. दरम्यान, विमान प्रवाशांच्या तक्रारींचा निपटारा करण्याबाबतही मंत्री नायडू यांनी या बैठकीत सुचना दिल्या.

****

नागपुरात सर्व सोयी सुविधांनीयुक्त जागतिक दर्जाचं कन्व्हेन्शन सेंटर उभारण्यात येणार आहे. याबाबत राज्य सरकार आणि स्पेनच्या फिरा बार्सिलोना आंतरराष्ट्रीय कंपनीमध्ये काल करार झाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी उपस्थित होते. नागपुरातील हे प्रस्तावित कन्व्हेन्शन सेंटर सांस्कृतिक कार्यक्रमांच्या आयोजनासाठी हक्काचं व्यासपीठ बनेल असा विश्वास, फडणवीस यांनी व्यक्त केला. मुंबई हे भारताचेच नव्हे, तर दक्षिण आशियाचे 'आर्थिक शक्ती पीठ' बनत आहे. त्यामुळे महाराष्ट्रासोबत स्पेनला काम करायला आवडेल, अशा शब्दात स्पेनचे राजदूत जुआन अँटेनियो यांनी महाराष्ट्राचा गौरव केला.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात फुलंब्री इथं शेतकरी भवनासाठी दीड कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. याद्वारे, या समिती कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांना आधुनिक सुविधा, प्रशासकीय सोय आणि शेतमाल खरेदी-विक्रीसाठी सक्षम व्यवस्था उभी राहील्यानं विकासाचं नवं केंद्र मिळणार असल्याची माहिती आमदार अनुराधा चव्हाण यांनी दिली आहे.

****

बुलढाणा जिल्ह्यात अतिवृष्टीमुळं नुकसान झालेल्या मेहकर, लोणार, जळगाव जामोद, संग्रामपूर या तालुक्यांचा अतिवृष्टी बाधित यादीमध्ये समावेश करण्यात आला आहे. या तालुक्यात अतिवृष्टी होऊनही त्यांना अतिवृष्टी बाधित यादीतून वगळण्यात आलं होतं. यानंतर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी या तालुक्यांचा अतिवृष्टी बाधित यादीत समावेश करण्यासाठी पाठपुरावा केला होता, यानंतर राज्य शासनानं बुलढाणा जिल्ह्यातील तेरा तालुक्यांपैकी नांदुरा आणि संग्रामपुर अंशतः बाधित यादीत समावेश केला तर मेहकर, लोणार, सिंदखेडराजा, देऊळगावराजा, चिखली, बुलढाणा, मोताळा, खामगाव, जळगाव जामोद हे ९ तालुके पूर्णतः बाधित असल्याचा शासन निर्णय काल जाहीर केला.

****

कांद्यांच्या दरात सातत्यानं घसरण होत असल्यानं संतप्त शेतकऱ्यांनी काल स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या नेतृत्वाखाली नाशिक जिल्ह्यात निफाड तालुक्याच्या विंचूर इथं रास्ता रोको आंदोलन केलं. केंद्र सरकारनं नाफेड आणि एनएसएफद्वारे कांदा खरेदी करून तो बाजारात विक्रीसाठी आणल्यानं, दरावर परिणाम होत असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला.

****

सध्या,राज्याच्या बहुतांश भागातून मान्सूनच्या परतीसाठी स्थिती अनुकूल आहे. येत्या दिवसभरात कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता असून मराठवाडा आणि विदर्भात हवामान कोरडं राहील, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

****

दिल्ली इथं सुरु असलेल्या वेस्ट इंडिजविरुद्धच्या दुसऱ्या क्रिकेट कसोटी सामन्याच्या दुसऱ्या दिवशी आज भारतानं ४ बाद ५०६ धावा केल्या आहेत.

****